# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
# नियामक मंडळाची ७७ वी बैठक दिनांक ३१ जुलै २०१३

## ठराव

मा. ना. शशिकांत शिंदे, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ७७ वी बैठक दि. ३१ जुलै २०१३ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग समिती सभागृह रुम नं. २५५ (मुख्य), मंत्रालय मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, विशेष निमंत्रित, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

१. मा. ना. शशिकांत शिंदे ... मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष

२. मा. श्री. वल्लभ बेनके ... विसस व उपाध्यक्ष

३. इं. शि. मा. उपासे ... कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

**विशेष निमंत्रित**

१. मा. श्री. आनंदराव पाटील

**निमंत्रित अधिकारी**

१. इं. च. आ. बिराजदार ... मुख्य अभियंता (विप्र), पुणे

२. इं. अविनाश सुर्वे ... मुख्य अभियंता (जसं), पुणे

३. इं. राजन शहा ... मुख्य लेखा व वित्त अधिकारी (महामंडळ) (अ.का.)

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**"मान्य"**

**सही/-**
**(इंजि. शि. मा. उपासे)**
**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**सही/-**
**(मा. ना. श्री. शशिकांत शिंदे)**
**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
# नियामक मंडळाची ७७ वी बैठक दिनांक ३१ जुलै २०१३

## ठराव

**ठराव क्रमांक ७७/१**

"नियामक मंडळाच्या ७५ व्या बैठकीत पारीत केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाबाबत कोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही"

**ठराव क्रमांक ७७/२**

"ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या ७६ व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव  कायम करण्यात येत आहेत"

**ठराव क्रमांक ७७/३**

"ठराव करण्यात येतो की,

महामंडळाकडील सिंचन प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून माहे सप्टेंबर १९९८ मध्ये रु.२०० कोटी इतकी रक्कम प्राप्त झाली आहे. सदर रक्कम परतफेडीसाठी शासनाने रु.४५७.७३ कोटीचे कर्जरोखे काढण्यास मान्यता दिली होती. मात्र सदर कर्जरोख्यास बाजारातून रोख स्वरुपात प्रतिसाद न मिळाल्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे कर्ज परत करता आलेले नाही. तसेच दि.०१.०१.२००५ पर्यंतची महामंडळाची सर्व कर्जे व्याजासह परतफेडीची जबाबदारी शासनाने स्विकारली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे १८० कोटी दि.०१.०१.२००५ पूर्वीचे असल्याने ते व्याजासह परतफेडीची जबाबदारी शासनाने स्विकारावी अशी शिफारस करण्यात येत असून तसा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा."

**ठराव क्रमांक ७७/४**

"ठराव करण्यात येतो की, महामंडळातंर्गत न्यायालयीन प्रकरणे हाताळण्यासाठी जिल्हा न्यायालय, औद्योगिक न्यायालय, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण येथील महामंडळाच्या पॅनेलवरील वकीलांना देय विधीशुल्क सन २००० मध्ये निश्चित केलेले होते. त्यानंतर मागील १३ वर्षातील भाववाढ विचारात घेता खाली दर्शविल्याप्रमाणे सुधारीत विधीशुल्क दि.०१/०८/२०१३ पासून पुढील कालावधीसाठी देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

**"मान्य"**

सही/-
(इंजि. शि. मा. उपासे)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

सही/-
(मा. ना. श्री. शशिकांत शिंदे)
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ७७ वी बैठक दिनांक ३१ जुलै २०१३

| अ. क्र. | न्यायालयीन प्रकरणांचा प्रकार | विधीशुल्क (रुपये) | |
|---|---|---|---|
| १. | जिल्हा न्यायालयातील भूसंदर्भ प्रकरणे (लोकन्यायालयातील प्रकरणांसह )<br>अ) एका प्रकरणासाठी | ३५००/- | (१५००/- प्रकरण दाखल केलेनंतर २०००/- निकाल लागलेनंतर) |
| | ब) एका वेळी तीनपेक्षा जास्त प्रकरणे एकत्र चालणार असतील तर | १०५००/- | (५०००/- प्रकरण दाखल केलेनंतर ५५००/- निकाल लागलेनंतर) |
| २. | जिल्हा न्यायालयातील इतर दिवाणी प्रकरणे<br>अ) रुपये ३ कोटीपर्यंत | १००००/- | (५०००/- प्रकरण दाखल केलेनंतर (५०००/- निकाल लागलेनंतर) |
| | ब) रुपये ३ कोटीचे पुढील | १५०००/- | (७५००/- प्रकरण दाखल केलेनंतर ७५००/- निकाल लागलेनंतर) |
| ३. | कामगार न्यायालयातील प्रकरणे<br>अ) एका प्रकरणासाठी | ३०००/- | (१५००/- प्रकरण दाखल केलेनंतर १५००/- निकाल लागलेनंतर) |
| | ब) एका वेळी तीनपेक्षा जास्त प्रकरणे एकत्र चालणार असतील तर | ९०००/- | (४५००/- प्रकरण दाखल केलेनंतर ४५००/- निकाल लागलेनंतर) |
| ४. | औद्योगिक न्यायालयातील प्रकरणे<br>अ) एका प्रकरणासाठी | ५०००/- | (२५००/- प्रकरण दाखल केलेनंतर २५००/- निकाल लागलेनंतर) |
| | ब) एका वेळी तीनपेक्षा जास्त प्रकरणे एकत्र चालणार असतील तर | १०५००/- | (५०००/- प्रकरण दाखल केलेनंतर ५५००/- निकाल लागलेनंतर ) |
| ५. | ग्राहक मंचातील प्रकरणे<br>अ) एका प्रकरणासाठी | ३०००/- | (१५००/- प्रकरण दाखल केलेनंतर १५००/- निकाल लागलेनंतर) |
| | ब) एका वेळी तीनपेक्षा जास्त प्रकरणे एकत्र चालणार असतील तर | ९०००/- | (४५००/- प्रकरण दाखल केलेनंतर ४५००/- निकाल लागलेनंतर) |
| ६. | महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधीकरणातील प्रकरणे (मॅट)<br>अ) एका प्रकरणासाठी | ७०००/- | (३५००/- प्रकरण दाखल केलेनंतर ३५००/- निकाल लागलेनंतर) |
| | ब) एकत्रित प्रकरणे असल्यास पुढील प्रत्येक प्रकरणासाठी | २०००/- | (१०००/- प्रकरण दाखल केलेनंतर १०००/- निकाल लागलेनंतर) |

**"मान्य"**

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. शि. मा. उपासे) | (मा. ना. श्री. शशिकांत शिंदे) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ७७ वी बैठक दिनांक ३१ जुलै २०१३

| अ. क्र. | न्यायालयीन प्रकरणांचा प्रकार | विधीशुल्क (रुपये) |
|---|---|---|
| ७. | दरखास्त प्रकरणे / रक्कम वसुली / Execution Petition /Recovery of Decreetal Amount etc.<br>अ) एका प्रकरणासाठी | २५००/- (१०००/- प्रकरण दाखल केलेनंतर १५००/- निकाल लागलेनंतर) |
| | ब) एका वेळी तीनपेक्षा जास्त प्रकरणे एकत्र चालणार असतील तर | ७५००/- (३५००/- प्रकरण दाखल केलेनंतर ४०००/- निकाल लागलेनंतर) |
| ८. | कलम ८० सीपीसी किंवा इतर प्रकरणी नोटीसीना कायदेशीर उत्तर तयार करुन देणे (प्रतिनोटीस). | १०००/- (कार्यवाही झालेनंतर) |
| ९. | खाजगी वाटाघाटीनी जमीन खरेदी करणे, त्यासाठीचे सर्च रिपोर्ट व खरेदी खत तयार करणे (प्रति खरेदी खत ) | १५००/- ( कार्यवाही झालेनंतर ) |

एखादे भूसंदर्भ प्रकरण लोकन्यायालयात वर्ग झाल्यास सदर प्रकरण ज्या वकीलाकडे तो भूसंदर्भ जिल्हा न्यायालयात चालू होता, त्याच वकीलाने लोकन्यायालयामध्ये हाताळणे आवश्यक आहे. त्याकरिता वेगळे विधीशुल्क अदा केले जाणार नाही.

न्यायालयीन प्रकरणांचा निकाल महामंडळाच्या म्हणण्यानुसार पूर्णपणे महामंडळाच्या बाजूने लागल्यास उपरोक्त नमूद विधीशुल्कांच्या ५० टक्के इतकी अतिरिक्त रक्कम प्रोत्साहन म्हणून संबंधीत वकीलास देय राहील. त्याकरिता संबंधीत वकीलाने सर्व कागदपत्रासह प्रस्ताव महामंडळाच्या कायदा कक्षाकडे सादर करणे आवश्यक राहिल.

उपरोक्त नमूद विधीशुल्काशिवाय कोर्ट फी,स्टॅम्प फी इत्यादी स्वतंत्रपणे देय राहील.

उपरोक्त विधीशुल्का व्यतिरिक्त अनुषंगीक खर्च महामंडळाचे परिपत्रक जा.क्र.मकृखेविम/ आ-८/६२- २०१३/ २५२० दि.३०/०३/२०१३ अन्वये देय राहील.”

**ठराव क्रमांक ७७/५**

“ठराव करण्यांत येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळातील कायदे सल्लागार यांना महामंडळाचे कायदेविषयक कामकाजाबाबत महामंडळात ये-जा करण्यास प्रवासासाठी वाहन देण्याऐवजी ठोक रक्कम रु. ५०००/- फक्त दरमहा देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.”

“मान्य”

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. शि. मा. उपासे) | (मा. ना. श्री. शशिकांत शिंदे) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ७७ वी बैठक दिनांक ३१ जुलै २०१३

ठराव क्रमांक ७७/६

"ठराव करण्यात येतो की,

जनाई उपसा सिंचन योजनेअंतर्गत टप्पा क्र.३ साठीच्या पंपींग यंत्रसामग्रीचा व अनुषंगीक घटक भागांचा पुरवठा सन २०००-२००१ मध्ये झालेला असून तत्कालीन नियोजनानुसार अपेक्षित निधी उपलब्धता न झाल्याने तसेच मयुरेश्वर वन परिक्षेत्र दि.१९/०८/१९९७ रोजी घोषीत झाल्याने (सन २००१ मध्ये वन विभागाने अभयारण्य कायद्यानुसार सर्वोच्च न्यायालयाची परवानगी मिळेपर्यंत कामास मनाई केली.) अभयारण्य क्षेत्रात प्रकल्पाची कामे करण्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयाची परवानगी मिळण्यास विलंब झाल्याने पंपगृहाची स्थापत्य कामे पूर्ण होऊ न शकल्याने पुरवठा झालेल्या पंपांची उभारणी व कार्यान्वितीकरण आतापर्यंत होऊ शकले नाही.

- त्यामुळे सन २०००-२००१ मध्ये पुरवठा झालेली पंपींग यंत्रसामग्री, विद्युत सामुग्री व अनुषंगीक घटकांच्या लोखंडी भागांना हवामान, उष्णता यांचेमुळे गंज चढला आहे. तसेच काही घटक उदा. रबर पार्ट, विद्युत भागापैकी केबल, रिले, वायन्डींग, वार्नीशिंग, स्विचेस इ. घटकांचे निर्धारीत आयुर्मान संपलेले आहे.
- तसेच अर्धवट स्थितीतील उध्दरण नलिका पुनर्स्थापीत करणे व एक्सपान्शन जॉईंट्स, एअर व्हॉल्व्ह यांचे सर्व्हिसिंग ही कामे करणे आवश्यक झाले आहे. या बाबी विचारात घेता उद्धरण नलिका यंत्रसामग्री, व्हॉल्व्ह व विद्युत उपकरणांची अत्यावश्यक व अपरिहार्य असलेली दुरुस्ती करण्यासाठी व सुटे भाग बदलण्यासाठी येणाऱ्या रु.९२.८८ लक्ष इतक्या खर्चास नियामक मंडळाची "खास बाब" म्हणून मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्रमांक ७७/७

ठराव करण्यात येतो की,

निरा डावा कालवा किमी. ७६ ते ७९ हा १२५ वर्षापूर्वीचा जुना कालवा बारामती नगरपरिषदेच्या शहर हद्दितून जातो. कालव्याच्या व शहराच्या सुरक्षितेतेच्या दृष्टीने सदर कालव्याचे मजबुतीकरण व सुशोभीकरण नगरपरिषदेच्या खर्चाने करण्यास परवानगी मिळण्याबाबतची मागणी मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद यांनी त्यांचे पत्र क्र. १३४५ दिनांक १८/७/२०१३ नुसार केलेली आहे. कालव्याच्या व शहराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून कालवा मजबुतीकरण व संपादित क्षेत्रातील उर्वरित भागात सुशोभीकरण करण्यास नियामक मंडळाची खालील अटी व शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे.

"मान्य"

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. शि. मा. उपासे) | (मा. ना. श्री. शशिकांत शिंदे) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ७७ वी बैठक दिनांक ३१ जुलै २०१३

(१) सदर कालव्याच्या मजबुतीकरणाकरीता येणारा संपूर्ण खर्च बारामती नगरपरिषद यांनी ठेव अंशदान स्वरुपात जलसंपदा विभागास आगाऊ वर्ग करणे आवश्यक राहील.

(२) बारामती नगरपरिषदेने सदर जागेचा वापर सुशोभीकरणा व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यावसायिक कामासाठी करु नये.

(३) सदर जागा महामंडळाच्या मालकीची असल्याने भविष्यात सदर जमिनीवर बारामती नगरपरिषदेचा कोणताही हक्क राहणार नाही.

(४) भविष्यात नीरा डावा कालवा कि.मी.७६/०० ते ७९/०० या लांबीमधील जागेत जलसंपदा विभागास आवश्यकता भासल्यास सदर जागा तात्पुरती किंवा कायम स्वरुपी घेण्याचा अधिकार जलसंपदा विभागास राहील.

(५) सुशोभीकरणाच्या कामांमुळे मुख्य कालव्याच्या प्रवाहास किंवा देखभाल दुरुस्तीच्या कामात अडथळा येणार नाही याची जबाबदारी नगरपरिषदेवर राहील. सुशोभीकरणाच्या नियोजित आराखडयास मुख्य अभियंता (जसं), पुणे यांची पुर्व मान्यता घेणे आवश्यक राहील.

(६) नीरा डाव्या कालव्याच्या कि.मी ७६/०० ते ७९/०० या लांबीतील सुशोभीकरण व इतर कामांची देखभाल दुरुस्तीची जबाबदारी बारामती नगरपरिषदेची राहील. फक्त कालव्या करीताच्या जलपेटीची देखभाल दुरुस्तीची जबाबदारी जलसंपदा विभागाची राहील.

(७) सदर जागेवर इतर कोणतेही अतिक्रमण रोखणेची जबाबदारी बारामती नगरपरिषदेची राहील.

(८) याबाबतच्या या अटी व शर्तीसह रितसर करारनामा नगरपरिषदेस कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे यांचे समवेत काम सुरु करणेपूर्वी करणे बंधनकारक राहील.

ठराव क्रमांक ७७/८

"ठराव करण्यात येतो की,

सातारा येथील नियोजित १०० विद्यार्थी क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व ५०० रुग्ण खाटांचे संलग्नीत रुग्णालय तसेच १०० खाटांच्या महिला रुग्णालयासाठी

"मान्य"

सही/-
(इंजि. शि. मा. उपासे)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

सही/-
(मा. ना. श्री. शशिकांत शिंदे)
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
# नियामक मंडळाची ७७ वी बैठक दिनांक ३१ जुलै २०१३

**महामंडळाच्या कृष्णानगर, सातारा येथील वसाहतीमधील पूर्वेकडील ५० एकर जागा देण्यासाठी मा. जिल्हाधिकारी, सातारा यांनी त्यांच्या दिनांक २२/०७/२०१३ च्या पत्रात सूचित केल्यानुसार जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडे हस्तांतरीत करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.**

**अटी व शर्ती**

**(१) वैद्यकिय महाविद्यालयासाठी द्यावयाच्या जागेतील महामंडळांतर्गत व शासकीय कार्यालयीन, निवासी व इतर इमारती कृष्णानगर वसाहतीमधील शिल्लक राहाणा-या जागेत पुर्नस्थापित करुन मिळाव्यात. त्यासाठी आरोग्य विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत नवीन इमारती बांधून द्याव्यात किंवा त्यासाठी आवश्यक निधी महामंडळास उपलब्ध करुन द्यावा.**

**(२) पुनर्स्थापित करण्यासाठीच्या नवीन इमारतीचे आराखडे महामंडळाकडून संमत करुन घ्यावेत.**

**(३) या ५० एकर जागेमधील सध्याच्या वापरात असलेल्या इमारतीची पुनर्स्थापना जशी जशी होईल त्यानुसार सदरची जागा रिक्त करुन हस्तांतर करण्यात येईल.**

**(४) सदर जमिनीची शीघ्रगणकानुसारची किंमत महामंडळास मिळावी.**

तद्नंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**“मान्य”**

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **(इंजि. शि. मा. उपासे)** | **(मा. ना. श्री. शशिकांत शिंदे)** |
| **कार्यकारी संचालक** | **मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)** |
| **म.कृ.खो.वि.म, पुणे** | **व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे** |